# जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी,गडचिरोली
## यांचे कार्यालय कॉम्प्लेक्स एरिया, गडचिरोली
## (जनगणना-शाखा)

दुरध्वनी:- 07132 -222005 Email- rdcgadchiroli@gmail.com

क्र.कार्या-7/म.स./जनगणना/कावि/204/2026 दिनांक:- 04 ~~एप्रिल~~ मे, 2026

प्रति,

सर्व विभाग प्रमुख

**विषय:**- जनगणना-2027 अंतर्गत स्व-गणनेबाबत प्रचार प्रसिद्धी करणेबाबत.

गडचिरोली जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांना आवाहन करण्यात येते की, जनगणना 2027 अंतर्गत स्व-गणना (Self Enumeration) ही सुविधा प्रथमच सुरू करण्यात आली असून हे एक नावीन्यपुर्ण आणि सोयीस्कर पर्याय आहे. कोणत्याही सामान्य कुटुंबातील उत्तरदात्याला त्यांच्या सोयीनुसार घरातून/कार्यालयातून किंवा इतर कुठूनही सुरक्षित वेब पोर्टल वापरून त्यांच्या कुटुंबाची माहिती ऑनलाइन भरण्याची मुभा देतो. अधिक आधुनिक, कार्यक्षम आणि समावेशक माहिती संकलन प्रक्रियेच्या दिशेने हे एक महत्त्वपुर्ण पाऊल आहे. तरी सदर सुविधा दि. 1 मे ते 15 मे, 2026 या कालावधीत उपलब्ध असून https://se.census.gov.in या संकेतस्थळावर जाऊन आपणास स्व-गणना पुर्ण करता येईल.

या पोर्टलवर आपण आपला मोबाईल क्रमांक टाकल्यानंतर OTP द्वारे Login करू शकता व त्यानंतर Geo Location Identify केल्यानंतर त्या साईटवर आपल्या कुटुंबाच्या माहिती संदर्भात 33 प्रश्न विचारले जातील व त्या प्रश्नांची उत्तरे दिल्यानंतर एक स्व-गणना ID (Unique SE ID) तयार होतो व तो कुटुंबाला SMS/Email द्वारा पाठविला जातो. जेव्हा प्रगणक आपल्या घरी भेट देईल तेव्हा सदर 11 अंकी SE ID verify करतात व त्यानंतर भरलेली माहिती जतन केली जाईल. स्व-गणना प्रक्रियेमध्ये अचूक व संपुर्ण माहिती भरावी. स्व-गणनेबाबत अधिक माहिती वरील नमूद पोर्टलवर उपलब्ध आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या gadchiroli.nic.in या संकेतस्थळावर पण उपलब्ध आहे.

आपल्या कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनासुद्धा स्व-गणना करण्यास प्रोत्साहित करावे. स्व-गणना ही जनगणना प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग असून आपल्या सक्रिय सहभागामुळे ही प्रक्रिया अधिक अचूक व यशस्वी होणार आहे. तरी माझी सर्वांना विनंती आहे की, जनगणना 2027 अंतर्गत 1 मे ते 15 मे, 2026 या कालावधीमध्ये स्व-गणनाच्या मोहिमेमध्ये आपण आग्रहाने सहभागी व्हावे.

(अविश्यांत पंडा)
जिल्हाधिकारी तथा
प्रधान जनगणना अधिकारी, गडचिरोली